ePaper

दहशतवाद हा माणुसकीचा शत्रू: पंतप्रधान नरेंद्र मोदी



| वर्ष - 7 । अंक -57 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज(TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- विठ्ठल दर्शनाआधीच घात!
- पिंपरी-चिंचवडकरांच्या उपयोगकर्ता शुल्कसह वसुलीला विरोध

www.mahaenews.com | ।शुक्रवार, दि. 23 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# नदी सुधारला तत्वत: मंजुरी!

## » उद्योगमंत्री उदय सामंत : पवना, इंद्रायणी नदी स्वच्छतेच्या कामाचा डीपीआर

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवना, इंद्रायणी नदी स्वच्छतेच्या प्रश्न सरकारने गांभीर्याने घेतला आहे. उगमस्थानापासूनच नदी प्रदुषित होणार नाही याची खबरदारी घेतली जाणार आहे. नदी सुधारचा विकास आराखडा (डीपीआर) तयार करुन दोन ते तीन वर्षात काम पूर्ण होईल. या कामाला तत्वतः मंजुरी दिल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. एमआयडीसीतील रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडू नये अशा सूचना अधिका-यांना दिल्याचेही त्यांनी सांगितले.**



मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी नदी सुधारचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला आहे. त्यांच्या पाठपुराव्यानुसार उद्योगमंत्री सामंत यांनी आज (गुरुवारी) पिंपरी महापालिकेत पवना, इंद्रायणी नदी स्वच्छतेबाबत बैठक घेतली.

बैठकीला महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हा परिषदेचे सीईओ आयुष प्रसाद, एमआयडीसीचे सीईओ बिपीन शर्मा, महापालिका अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे अतिरिक्त आयुक्त विजय सिंघलआदी उपस्थित होते.

### कामासाठी एक ते दीड हजार कोटी खर्च

मंत्री सामंत म्हणाले, नदी सुधारसाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. त्यामध्ये खासदारांचा समावेश असेल. नदी सुधारचा आराखडा तयार करण्याचे निर्देश केले आहेत. तीन महिन्यांत आराखडा तयार होईल. कामासाठी एक ते दीड हजार कोटी खर्च येवू शकतो. त्याचा भार एमआयडीसी, महापालिका उचलणार आहे. अतिरिक्त निधी लागला तर तो निधी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. नदी स्वच्छ ठेवण्याची वारकऱ्यांची मागणी कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केली जाणार आहे. पवना, इंद्रायणी या दोनही नद्या स्वच्छ झाल्या पाहिजेत. एमआयडीसीच्या कंपन्यांकडून नदीपात्रात पाणी जात असेल, तर त्यासाठी एसटीपी करायचा की सीईटीपी करायचा यावर निर्णय घेतला जाईल. एमआयडीसीचे पाणी नदीत जावू नये यासाठी पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यापर्यंत नदी स्वच्छतेच्या कामाला सुरुवात होईल. दोन वर्षात काम पूर्ण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. परंतु, काही परवानगीच्या अडचणी आल्यास तीन वर्षात नदी स्वच्छतेचे काम पूर्ण झालेले दिसेल.

### नद्यांचे प्रदूषण उगमस्थानापासूनच रोखणार

**» खासदार बारणे म्हणाले, नदी सुधारसाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नदी सुधारचा प्रश्न गांभीर्याने घेतला आहे. दोन दिवसांपूर्वी मुंबईत बैठक झाल्यानंतर उद्योगमंत्री सामंत यांनी शहरात येवून बैठक घेतली. नदी सुधारच्या कामाला मंजुरी दिली आहे. ऑक्टोबरपर्यंत डीपीआर तयार केला जाईल. नोव्हेंबरपासून प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली जाणार आहे. पवना, इंद्रायणी नद्यांचे प्रदूषण उगमस्थानापासूनच रोखण्यात येणार आहे.**

## रिक्षा चालक मालकांसाठी तातडीने कल्याणकारी महामंडळ गठीत होणार – उदय सामंत

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्रातील २० लाख रिक्षा चालक मालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने केली असून, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी उद्याच्या कॅबिनेट मंत्रिमंडळामध्ये हा निर्णय प्राधान्याने घेऊन तातडीने रिक्षा चालक मालकांसाठी कल्याणकारी महामंडळ गठित करण्याचे कारवाई केली जाईल, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी रिक्षा चालक मालकांच्या शिष्टमंडळास दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे एका महत्त्वाच्या विषयासाठी उद्योग मंत्री उदय सामंत हे आले असता यावेळी बाबा कांबळे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी रिक्षा चालक-मालकांच्या कल्याणकारी मंडळा संदर्भात चर्चा केली असता त्यांनी हे आश्वासन दिले असल्याची माहिती महाराष्ट्र रिक्षा पंचायत ऑटो रिक्षा टॅक्सी संयुक्त कृती समिती व देशव्यपी फेडरेशनचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी दिली.

बाबा कांबळे म्हणले, गेल्या अनेक वर्षांपसून महाराष्ट्रातील रिक्षा चालक मालकांनसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची मागणी रिक्षा चालक मालकांनी केली आहे. यासाठी अनेक आंदोलने व मोर्चा देखील रिक्षा चालक मालकाने काढले होता.

सरकारने आता कल्याणकारी महामंडळाची घोषणा केली आहे. परंतु याची अंमलबजावणी व्हावी, रिक्षा चालक मालकांना इलेक्ट्रिक रिक्षासाठी अनुदान मिळावे. मुक्त रिक्षा परवाना बंद व्हावा यासह इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र रिक्षा पंचायत ऑटो टॅक्सी कृती समिती व नॅशनल ऑटो टॅक्सी बस ट्रान्सपोर्ट फेडरेशनच्या वतीने, महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे मंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले आहे.



# विठ्ठल दर्शनाआधीच घात!

## पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघातात वारकऱ्याचा जागीच मृत्यू

। इंदापूर, पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंढरपूर वारीसाठी दिंड्या निघाल्या आहेत. वारी हळहळू पंढरपूरजवळ पोहोचत आहे. पण एका दिंडीतील वारकऱ्याचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पुणे-सोलापूर महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका वारकऱ्याचा जागीच मृत्यू झाला.**

पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीला श्रीगोंदा येथून पायी वारीत निघालेल्या वारकऱ्याला पुणे सोलापूर महामार्गावर मदनवाडी ग्रामपंचायतच्या हद्दीत सकुंडे वस्ती येथे एका अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. आज पहाटे पाच वाजताच्या सुमारास झालेल्या या अपघातात वारकऱ्याचा मृत्यू झाला आहे. लक्ष्मण मार्तंड रोडे (वय ७५ व रा. घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि.अहमदनगर) असे या वारकऱ्याचे नाव आहे.

याबाबत भिगवण पोलिस ठाण्यामध्ये लक्ष्मण रोडे यांचे जावई कल्याण गुलाब घुटे (वय ४६ वर्ष रा. घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर) यांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत पोलिसांकडून माहिती देण्यात आली. बुधवारी रात्रीपासून श्रीगोंदा तालुक्यातील पायी दिंडी वारी सकुंडे वस्तीजवळ मुक्कामी होती. या दिंडीतील ज्येष्ठ वारकरी लक्ष्मण रोडे हे पुढील पायीवरीला मार्गस्थ होण्यापूर्वी आज पहाटे प्रातः विधीसाठी रस्ता ओलांडत होते. त्याचवेळी सोलापूर बाजूकडून पुण्याला जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने रोडे यांना जोरदार धडक दिली. या जोराच्या धडकेत लक्ष्मण



रोडे यांच्या डोक्यास तसेच उजव्या पायास गंभीर झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर वाहनचालक वाहनासह पसार झाला. सदर अपघाताचा पुढील तपास भिगवण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक लोकरे हे करत आहेत.

# लग्नास नकार दिल्याने हत्या, दर्शना पवार खूनप्रकरणी आरोपीची कबुली

## राजगड किल्ल्याच्या पायथ्याला दर्शनाचा मृतदेह सापडला होता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाराज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत राज्यात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या दर्शना पवार हिची हत्या तिचा मित्र सुधीर ऊर्फ राहुल दत्तात्रय हंडोरे यानेच केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी राहुलला मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानकातून बुधवारी रात्री ताब्यात घेतले. लग्नाला नकार दिल्याने दर्शनाची हत्या केल्याची कबुली राहुलने दिली आहे.**

१८ जून रोजी राजगड किल्ल्याच्या पायथ्याला दर्शनाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला होता. दर्शना आणि राहुल १२ जून रोजी सकाळी साडेआठला राजगड किल्ल्यावर गेले होते. सकाळी पावणेअकराला राहुल गडावरून एकटाच खाली आल्याचे किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या उपाहारगृहाच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणातून स्पष्ट झाल्याने त्याचा शोध घेण्यात येत होता. राहुलला बुधवारी रात्री अंधेरी स्थानक येथून ताब्यात घेण्यात आले असून, दर्शनाने लग्नास नकार दिल्याने तिची हत्या केल्याची कबुली आरोपीने दिल्याची माहिती पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

धमाल-मस्ती, डान्स, कुटुंबियांचा कल्ला पण...; लेकाच्याच लग्नात सनी देओलच्या पत्नीच्या चेहऱ्यावर दिसलं टेन्शन, नेटकरी म्हणतात, "निराश..."

दर्शनाची वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून निवड झाली होती. एका संस्थेतर्फे आयोजित सत्काराच्या कार्यक्रमासाठी ती ९ जूनला पुण्यात आली होती. नऱ्हे परिसरात एका



मैत्रिणीकडे ती राहत होती. १२ जूनला सिंहगडावर जायचे आहे, असे मैत्रिणीला सांगून ती घराबाहेर पडली. तिने कुटुंबीयांनाही तसे कळवले होते. तिचा मोबाइल बंद असल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात आल्याने त्यांनी शोध सुरू केला. ठावठिकाणा न लागल्याने दर्शना बेपत्ता असल्याची तक्रार सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. दर्शनाचा मृतदेह आढळल्याने वेल्हे पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दर्शनाच्या मामाच्या घराजवळ राहुलचे घर असल्याने या दोघांची जुनी मैत्री होती. दर्शनाने एमएस्सी (मॅथ्स) आणि राहुलने बीएस्सीपर्यंतचे (बॉटनी) शिक्षण घेतले होते. दोघेही स्पर्धा परीक्षांची तयारी करीत होते. अन्नपदार्थांची घरपोच सेवा देणारी अर्धवेळ नोकरी राहुल करीत होता.



## औद्योगिकनगरीच्या विकासासाठी आता 'शाश्वत विकास कक्ष'!

।पिंपरी। महाईन्यूज ।

औद्योगिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. शहराला पायाभूत सुविधांची गरज आहे. शहराचा संतुलित मार्गाने विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी शाश्वत विकासाच्या विविध बाबींवर काम करण्याकरिता प्रशासकीय संरचनेत 'शाश्वत विकास कक्ष' सुरू करण्यात आल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने बुधवारी वाकड येथे शाश्वत विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना सिंह यांनी ही माहिती दिली. यावेळी आमदार उमा खापरे, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, प्रदीप जांभळे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जितेंद्र कोळंबे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे आदी उपस्थित होते. शाश्वत विकासाच्या संकेतस्थळाचे आमदार खापरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

नागरिकरणाचा वेग प्रचंड वाढत आहे. शाश्वत विकासाच्या विविध बाबींवर काम करण्यासाठी शाश्वत विकास कक्ष सुरू करण्यात आला आहे. महापालिका शाश्वत विकास कक्षाच्या माध्यमातून आदर्श शहराच्या विकासासाठी काम करीत आहे. लोकप्रतिनिधी म्हणून महापालिकेच्या या स्तुत्य उपक्रमासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे आमदार खापरे म्हणाल्या.

# पिंपरी-चिंचवडकरांच्या उपयोगकर्ता शुल्कसह वसुलीला विरोध

## भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांची मागणी

### महापालिका आयुक्त शेखर सिंह अन सोसायटी पदाधिकाऱ्यांची बैठक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडकरांवर लादलेल्या उपयोगकर्ता शुल्काबाबत महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हिताचा निर्णय घ्यावा. प्रशासनाच्या चुकीचा निर्णय नागरिकांच्या माथी मारु नये. या कराला शहरवासीयांचा विरोध आहे. त्यामुळे सुरू असलेली उपयोगकर्ता करवसुली तात्काळ रद्द करावी, अशी आग्रही मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



उपयोगकर्ता शुल्क आकारणीला शहरातील स्वंयसेवी संस्था, संघटना, सोसायटी फेडरेशन यांच्यासह सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे. याबाबत आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका भवनामध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह, सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह प्रतिनिधी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत घनकचऱ्याची हाताळणी व व्यवस्थापन करण्यासाठी शहरातील सर्व मालमत्तांकडून उपयोगकर्ता शुल्काची आकारणी करण्याबाबत राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने दि. १ जुलै २०१९ रोजी अधिसूचना जाहीर केली होती. मात्र, गेल्या चार वर्षात याबाबत प्रशासनाने अंमलबजावणी केली नाही.

महापालिका प्रशासन शहरातील प्रति मालमत्ता ६० रुपये प्रतिमहा अशा प्रमाणे वार्षिक ७२० रुपये अशी दि. १ जुलै २०१९ पासून 'उपयोगकर्ता शुल्क व दंड' वसुली सुरू केली आहे, याला शहरातील नागरिकांचा विरोध आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, प्रशासनाने दि. १ जुलै २०१९ पासूनच उपयोगकर्ता शुल्काची वसुली करणे अपेक्षीत होते. मात्र, प्रशासकीय दिरंगाईचा भुर्दंड सर्वसामान्य नागरिकांच्या माथ्यावर मारण्याचा प्रयत्न केला जात आहे. शासन निर्णय असतानाही करवसुलीची अंमलबजावणी करण्यासाठी दिरंगाई करुन नागरिकांवर दंडाचा बोजा टाकण्याऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे.

तसेच, राज्य शसनाने दि. १९ डिसेंबर २०१८ रोजी पहिली अधिसूनचा काढली होती. त्या अधिसूचनेनुसार, उपयोगकर्ता शुल्क लागू करताना नागरी स्थानिक संस्थांकडून हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. स्वच्छता व आरोग्य प्रारुप उपविधी प्रसिद्ध करण्याचे अधिसूचित केले होते. त्याला सर्वपक्षीय गटनेत्यांनी विरोध केला होता. सुरूवातीला प्रशासनाचा हा प्रस्ताव दप्तरी दाखल केला होता. मात्र, पुन्हा त्याला मंजुरी देण्यात आली. मात्र, या उपयोगकर्ता शुल्क व दंडाच्या वसुलीला शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचा विरोध आहे, ही बाब प्रशासनाने लक्षात घेतली पाहिजे, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली.

> **महापालिका प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गेल्या चार वर्षांच्या शास्तीसह उपयोगकर्ता शुल्काची वसुली म्हणजे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांसाठी अन्यायकारक ठरणार आहे. त्यामुळे व्यापक जनहिताच्या दृष्टीने चार वर्षांचा कर आकारणीचा निर्णय रद्द करावा. 'झिरो गार्बेज' सोसायटीधारकांना कचरा उचलण्याबाबतचे शुल्क आकारु नये. या मागणीवर आम्ही ठाम आहोत. याबाबत प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा आहे.**
>
> **- महेश लांडगे,**
> **शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

### 'झिरो गार्बेज' सोसायट्यांना दिलासा?

**दरम्यान, महापालिका प्रशासन राज्य सरकारच्या अधिसूचनेचा आधार घेत उपयोगकर्ता शुल्क आणि २०१९ पासून २ टक्के व्याजासह होणारी वसुली तात्काळ थांबवावी. प्रामुख्याने हा कर रद्द करावा. तसेच, पर्यावरण पूरक सोसायट्यांच्या सवलतीलच्या कक्षा विस्ताराव्यात. ज्यामुळे अधिकाधिक मिळकतधारकांना करसवलतींचा लाभ घेता येईल. ज्या सोसायट्या सोसायटीच्या आवारातच कचरा जिरवतात. 'झिरो गार्बेज' धोरण राबवणाऱ्या त्या सोसायटीतील मिळकतधारकांना कचरा उचलण्यासाठी लागू केलेले शुल्क आकारणी करु नये, अशा प्रमुख मागण्या आमदार लांडगे यांनी केल्या आहेत. यावर महापालिका आयुक्तांनी सकारात्मक तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.**

# बोपखेल आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घ्या

## आमदार अण्णा बनसोडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज

**बोपखेल मधील रस्त्यासाठी २०१५ साली झालेल्या आंदोलनात दोनशेहून अधिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. हे गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे. आमदार बनसोडे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विरोधी पक्षनेते अजित पवार यांना निवेदन दिले आहे.**



पिंपरी विधानसभेचा अविभाज्य भाग असलेला बोपखेल परिसर 2015 मध्ये रस्त्याच्या अभावी दूरवर झाला होता. CME दापोडी मधून जाणारा रस्ता सुरक्षेच्या कारणावरून कायमस्वरूपी बंद करण्यात आला. त्यावेळी बोपखेलवासीय एकजुटीने रस्त्यावर उतरले त्यांना त्यांचा हक्काचा रस्ता हवा होता. मात्र देशाची सुरक्षितता व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता त्यांचा संघर्ष आजतागायत सुरू आहे.

केंद्राच्या अखत्यारीत असलेला हा विषय लवकरच मार्गी लावण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र दरम्यानच्या काळात २०१५ मध्ये झालेल्या आंदोलनात जवळपास २०० पेक्षा जास्त बोपखेलवासीयांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यांना तुरुंगात डांबले गेले. त्या सर्व कार्यकर्त्यांना व त्यांच्या घरच्यांना रस्ता आंदोलनाच्या झळा आज देखील सोसाव्या लागत आहेत. आज त्या आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यावरील गुन्हे मागे घ्यावेत यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विरोधी पक्षनेते अजित पवार यांना भेटून आमदार अण्णा बनसोडे यांनी निवेदन दिले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येत्या पावसाळी अधिवेशनात हा विषय निकाली काढण्यात येईल असे आश्वासन दिले. तर राज्याचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा करून लवकरच गुन्हे माघे घ्यायला लावू असे आश्वासन दिले.

# कुण्याही जीवाचा न घडो मत्सर



भूमिका
निलेश दुटाळ
91- 87668 40811

**जगातील सर्वच धर्म चांगले आहेत परंतु अनुयायी त्याला बदनाम करीत असतात असे सरसकट विधान अनेक लोक करीत असतात. धर्माच्या कट्टर पोलादी तटबंदीचा हा विजय असतो. बालपणापासून ज्यांना धार्मिक तत्वज्ञान कोळून पाजलेले असते त्या अनुयायांना आपल्या धर्मात काही वाईट किंवा कालबाह्य झाले असेल याची किंचितही शंका येत नाही कारण धर्म आणि धर्मग्रंथ प्रत्यक्ष देवाने निर्माण केलेले आहेत हे प्रत्येकाच्या मेंदूवर बिंबवले असते. .**

आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आणि इतर कसे दुय्यम दर्जाचे आहेत हे दाखवण्याची चढाओढ गेली शेकडो वर्ष विविध धर्माच्या अनुयायांत लागलेली दिसते. सगळ्याच धर्माच्या मूळ तत्वज्ञानात प्रचंड गोंधळ आणि परस्पर विरोधी विचार आहेत आणि हे सगळे सर्वशक्तिमान देवाने दिले आहेत असे मानणारे अनुयायी बौद्धिकदृष्ट्या फारच सामान्य असतात हे आता मान्य करायला हवे. ग्रंथप्रामाण्य स्वीकारणाऱ्या सगळ्यांची स्थिती अशीच असते.



आजकाल बहुसंख्य हिंदू मुले प्रश्न करीत असतात की आपल्या देवांच्या हातात नेहमी शस्त्र का असतात ? त्याची धर्माभिमानी अनेक प्रकारची उत्तरे देऊन आहे तेच सर्वोत्तम कसे आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. कमीअधिक प्रमाणात सगळ्याच धर्माचे विद्वान अशीच चलाखी करीत असतात. धर्माच्या किंवा अध्यात्माच्या क्षेत्रात जे काही दिसते किंवा लिहून ठेवले आहे त्यात कोणतीही चूक असू शकत नाही किंवा आपण ती काढू शकत नाही असे त्यांना वाटत असते. असे वाटणाऱ्याना धर्म आणि जीवनाचे सुद्धा प्रवाहीपण मान्य नसते. कट्टर मानसिकता इथूनच अंकुरित जाते. जे जसे आहे तसे शंभर टक्के स्वीकारणे हा मूलतत्त्ववाद जोपासण्याची अनेकांना घाई असते किंबहुना धर्माच्या शाळेत तसेच शिकवले जात असते म्हणून त्यात साचलेपण येत आहे. ज्यांना कालानुरूप बदल हवे असतात त्यांचे धर्माइक जीवनही अतिशय आनंदी झालेले असू शकते.

आजोबानी मौल्यवान पाण्याचा भरून ठेवलेला माठ तसाच ठेवायचा असेल तर एक दिवस त्यात जंतू निर्माण होऊन त्याचे प्राशन आरोग्याला घातक ठरेल याची जाणीव ज्यांना असते ते लोक आजोबांच्या हातचा माठ कायम ठेवून त्यातील पाणी बदलत राहतात. ज्यांना हे शक्य होत नाही त्यांच्या जगण्यात साचलेपण येते त्याचे वाईट परिणाम व्यक्तीसोबत समाजावर होताना आपण एवढी वर्ष बघत आहोत. निसर्गाने प्रत्येकाला बुद्धी ही अमूल्य देणगी दिली आहे तिचा जेवढा वापर केला जाईल तेवढी तिची संपत्ती वाढत जाईल हे सर्वमान्य तत्व असताना बुद्धीचा वापर करू नका असा आदेश जर कोणता धर्म देत असेल तर त्यापासून अनुयायांनी सावध असायला हवे कारण बुद्दीचा वापर रोखण्याचा आदेश म्हणजे स्वतंत्र विचार करण्याची क्षमता समाप्त करणे असते आणि कोणत्याही धर्माला स्वतंत्रपणे विचार करणारा अनुयायी नको असतो . ज्यांनी हा विचार केला त्यांना बाहेर पडावे लागले.

धर्मांची इमारत अनुयायांच्या अज्ञानावर उभी असते,एकदा का हे अज्ञान दूर झाले की धर्माच्या इमारती पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळायला लागतात हे आजवर जगभर बघायला मिळाले आहे. प्रत्येक धर्माने अनुयायांना मृत्युपरांत जीवनाची जबरदस्त बीटी घातली आहे. इस्लाम मध्ये तर सध्याचे जीवन म्हणजे कैदखाना समजले आहे,खरे मुस्लिम अनुयायांचे खरे जीवन मरणाच्या नंतर सुरु होईल ,त्याच जीवनाची काळजी प्रत्येकाने करायला हवी असे सुचवले आहे. हिंदू धर्मातही स्वर्ग आणि नरकाची संकल्पना अनेक पुराणांनी मांडली आहे. या जन्मात चांगली कामे करणारे स्वर्गात आणि वाईट लोक नरकात जातील अशी कल्पना आहे. मेल्यानंतर आपले काय होईल याची जबरदस्त भीती धर्माने लोकांमध्ये निर्माण करून ठेवल्याने धर्मांचे साम्राज्य एवढ्या काळानंतरही अबाधित आहे. आकाशात आणि जमिनीत काय असू शकते याच्याही सुंदर कल्पना धार्मिक ग्रंथांनी रंगवून ठेवल्याने अजूनही अनुयायी त्यातून मुक्त होऊ शकले नाहीत.

कुण्याही जीवाचा न घडो मत्सर हे तत्वज्ञान वाचायला आणि ऐकायला अतिशय सुंदर वाटत असले तरी त्याचे पालन कोणत्याही धर्माचे मूळ तत्वज्ञान करीत नसते. कारण कुणाचा तरी मत्सर,द्वेष केल्याशिवाय स्वतःचा धर्म श्रेष्ठ ठरू शकत नाही ही मेख त्याच्या बुडाशी असते. जगात केवळ वारकरी संप्रदायाने भक्ती आणि अध्यात्मातील साचलेपण दूर करून सर्वांना हृदयाशी कवटाळून कोणताही भेद जवळ ठेवल्याचे दिसत नाही. अलीकडे त्यातही कट्टर आणि मूलतत्वादी लोकांनी जाणीवपूर्वक शिरकाव करून वारकरी संप्रदायाला हिंदू धर्माची शाखा करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. असे असले तरी आजही हा केवळ एकच मार्ग असा आहे की ज्यात अनेकांनी मिठाचे खडे टाकूनही सगळ्या जाती,धर्माला घेऊन चालण्यात ज्यांना कमीपणा वाटत नाही आणि ज्यांच्या भक्तीचे माप कुण्या धर्मग्रंथावर जाऊन थांबत नसावे. आपणही अश्याच सर्वसमावेशक दिशेने जाऊन प्रवाहीपण स्वीकारले पाहिजे.

## संपादकीय »

### वाचाळांची दिंडी

***सारा महाराष्ट्र भक्तिभावाने डोळे लावून बसलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थानाच्या वेळी झालेला लाठीमार आणि त्यावरून सुरू झालेले राजकारण दुर्दैवी म्हणावे लागेल. हे...***

वारकऱ्यांवर लाठीमार झाल्याचा आरोप करून विरोधी पक्षांनी रान उठविले, तर लाठीमार झालाच नाही, असा सत्ताधाऱ्यांचा दावा आहे.आपल्या म्हणण्याला पुष्टी देण्यासाठी वेगवेगळे व्हिडिओ पुढे आणले जात आहेत. दोन्ही बाजू समजावून घेऊन जबाबदारीने भूमिका मांडणारे मात्र दुर्मीळ झाले आहेत. त्यासाठी आळंदीत झालेल्या घटनेची पार्श्वभूमी तपासावी लागेल. मानाच्या दिंड्यांपैकी प्रत्येकी ७५ जणांना मंदिरात प्रवेश देण्याचे ठरले होते. मात्र, ऐनवेळी काही जणांनी प्रवेशाचा आग्रह धरला. त्यात वाद झाला आणि सुरक्षा कठडे तोडून आत शिरलेली गर्दी पांगविण्याच्या प्रयत्नांत हा प्रकार घडला. त्याला 'लाठीमार' म्हणावे, 'सौम्य लाठीमार' म्हणावे की पोलिस आणि वारकऱ्यांमधली 'झटापट' म्हणावे, हे बोलणारा कोणत्या राजकीय पक्षाचा आहे, यावर ठरते आहे. घटनेनंतर काही क्षणांत ही बातमी सर्वत्र गेली.

**सारे जग जवळपास अडीच-तीन वर्षे उलटेपालटे करून टाकणारा आणि पुढील अनेक वर्षे आपली अदृश्य मुद्रा जगाच्या वाटचालीवर उमटविणारा करोना नावाचा विषाणू आता अखेर भारतात पुरता निष्प्रभ झालेला दिसतो. भारत शंभर टक्के करोनामुक्त झाला नसला आणि आजही करोनाचे अगदी किरकोळ प्रमाणात रुग्ण सापडत असले तरी करोनाची नांगी आता जहरी राहिलेली नाही.**

## दु:स्वप्न अखेर संपले?

मुख्य म्हणजे, करोनाच्या रुग्णांचे प्रमाण यापुढे आणखी घटत जाईल आणि जवळपास प्रत्येक रुग्णाला होणारी करोनाबाधा बरी होणार आहे. २० जून, २०२३ रोजी संपूर्ण देशात केवळ ३६ करोना रुग्णांची नोंद झाली. भारताचा एकूण आकार आणि लोकसंख्या पाहता हा आकडा काहीच नाही. मार्च, २०२० पासूनचा काळ पाहिला तर हा रुग्णसंख्येचा नीचांक आहे. आणि तो आणखी खाली जाईल. वैज्ञानिक आणि डॉक्टरांपुढचे येत्या काळातले आव्हान म्हणजे, आजवर भारतात सापडलेल्या करोना विषाणूच्या प्रत्येक प्रकाराची नोंद ठेवणे आणि त्या प्रत्येकाची जनुकीय सूत्रावली म्हणजे जिनोम सिक्वेन्सिंग निश्चित करणे. सध्या भारतीय वैज्ञानिक २२४ प्रकारांची अशी जनुकीय सूत्रावली करण्यात गुंतले आहेत. हे काम भविष्याच्या दृष्टीने मोलाचे आहे. आता या नोंदविल्या गेलेल्या प्रकारांपेक्षाही नवाच प्रकार भारतात सापडला तर मात्र त्या रुग्णाचे पुन्हा विलगीकरण करावे लागेल आणि सध्या दिल्या जाणाऱ्या लशी त्या प्रकाराचा बंदोबस्त करण्यास समर्थ आहेत का, हेही काळजीपूर्वक जोखावे लागेल.

करोना हे भारतापुढचे अनेक अंगांनी उभे ठाकलेले आव्हान होते. त्यातून भविष्यासाठी अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. भारतीय हे कोणतेही आव्हान उभे राहिले की पूर्ण ताकदीने प्रतिसाद देतात. अभूतपूर्व वेगाने कामे करतात. मात्र, सारे काही सुरळीत झाले की, भारतीय समाज पुन्हा ढिला पडतो. सार्वजनिक ठिकाणी न थुंकण्याची




किंवा कचरा न करण्याची सवय करोना काळात बहुतेकांनी लावून घेतली होती. तिचे आता पुन्हा विस्मरण झाले आहे. बुधवारी देशात ३२७ जणांचे लसीकरण झालेले राष्ट्रीय पोर्टलवर दिसते आहे. मात्र, साऱ्या देशाचे दुहेरी लसीकरण अद्यापही झालेले नाही. 'बूस्टर' गृहित धरला तर लोकसंख्येच्या तिप्पट म्हणजे चारशे कोटींच्या पुढे लसी दिल्या जायला हव्यात. मात्र, लसींचा सध्याचा एकूण आकडा २२० कोटी ६७ लाख ३४ हजार ९६७ दिसतो आहे. याचा अर्थ, लसीकरणाचे अजून बरेच काम बाकी आहे. ते वेगाने चालवून पुरे करणे आवश्यक आहे. साथ संपली असली आणि समाजात सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाली असली तरी लसीकरणाचे उद्दिष्ट आपण अजून गाठलेले नाही, हे विसरता कामा नये. साऱ्या जगातील करोनाबळींवर नजर टाकली तर भारतात एकूण साडेचार कोटी रुग्ण नोंदले गेले आणि त्यातील पाच लाख ३२ हजार दगावले. मात्र, करोना झालेला प्रत्येक रुग्ण नोंदला गेला का आणि या काळात मृत्यू झालेल्या प्रत्येक नागरिकाच्या मृत्यूचे नेमके कारण नंतर नोंदविले गेले आहे का, हे प्रश्न आजही अनुत्तरितच आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुस्लिम बांधवांनी दिला एकतेचा संदेश!

## आषाढी एकादशीला कुर्बानी देणार नाही

। नाशिक । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आषाढी एकादशी जवळ येत आहे. सर्व दिंड्या, वारकरी आणि विठ्ठल भक्त पुंढरपूरजवळ आहेत. पुढच्या काही दिवसांत आषाढी एकादशी असल्याने वारकऱ्यांमध्ये उत्साह आहे. आषढी एकादशीला यावेळी बकरी ईद आहे. यामुळे सर्व परस्थिती लक्षात घेता छत्रपती संभाजीनगरमधील मुस्लिम बांधवांनी एकतेचा संदेश दिला आहे.**



छत्रपती संभाजीनगर : आषाढी एकादशी अवघ्या काही दिवसांवर आली आहे. यामुळे प्रत्येकाला विठ्ठलाची आणि आषाढीची आतुरता लागून आहे. मात्र यंदाची आषाढी एकादशी वेगळी ठरणार आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी बकरी ईद आल्याने हे दोन्ही सण एकाच दिवशी साजरी होणार आहेत. मात्र, या सणाच्या निमित्ताने छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन बघायला मिळत आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी मुस्लिम बांधवांच्या वतीने कुर्बानी न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत असून कौतुक होत आहे. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रामध्ये किरकोळ कारणावरून दंगली घडत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. यामुळे राज्यामध्ये कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण झालं होतं. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मुस्लिम बांधवांनी एकतेचा संदेश देणारा निर्णय घेतला आहे.

आषाढी एकादशी आणि बकरी ईद एकाच दिवशी आल्यामुळे त्या दिवशी कुर्बानी न देण्याचा निर्णय पंढरपूरसह जिल्ह्यातील मुस्लिम बांधवांनी घेतला आहे. यामुळे पुरोगामी महाराष्ट्रामध्ये पुन्हा हिंदू मुस्लिम एकता बघायला मिळाली आहे. छत्रपती संभाजीनगर शहर हे संवेदनशील शहर म्हणून ओळखलं जातं. या ठिकाणी कुठल्याही छोट्या-मोठ्या घटनांचे रूपांतर मोठ्या घटनांमध्ये होत असते. यामुळे पोलिसांच्या वतीने खबरदारी बाळगण्यात आली आहे.

### बकरी ईदची कुर्बानी दुसऱ्या दिवशी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वाळूज पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीचे बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी सर्व समाजाचे नागरिक उपस्थित होते. यंदा आषाढी एकादशी आणि बकरी ईद एकाच दिवशी आली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक सलोखा राखण्यासाठी आणि मधला मार्ग काढण्यासाठी बैठक झाली. यावेळी बकरी ईदची कुर्बानी दुसऱ्या दिवशी करण्याचा निर्णय मुस्लिम बांधवांनी घेतला आहे. यावेळी वाळूज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश आगाव यांनी पुढाकार घेतला.

---

# अजितदादांकडून पदाची मागणी, भुजबळांनी ओबीसीच्या मुद्द्याचं हत्यार उपसलं!

। मुंबई । महाईन्यूज

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पायाभरणी करताना शरद पवारांनी काँग्रेसमधील अनेक मातब्बर मराठा नेत्यांना साथीला घेतलं. पद्मसिंह पाटील, विजयसिंह मोहिते पाटील.. अशा मुरब्बी नेत्यांसोबतच तरूण नेत्यांचीही पवारांना साथ लाभली. जयंत पाटील, आर.आर.पाटील, दिलीप वळसे पाटील ते राजेश टोपे.. शरद पवारांनी यांसारख्या उमद्या मराठा नेत्यांना ताकद दिली.

पवारांनी घडवलेल्या मराठी नेत्यांची यादी तशी मोठीच आहे. म्हणूनच पवारांवर मराठा वर्चस्वाचं राजकारणाचा आरोप केला जातो. मात्र सत्तेच्या आणि संघटनेच्या पदांवर इतर घटकांची वर्णी लावून पवारांनी प्रतिकात्मक राजकारण घडवून आणलं आणि समतोल राखण्याचा प्रयत्न केला. आणि आता याच प्रतिकात्मक मुद्द्याचं हत्यार छगन भुजबळांनी उपसलंय.



राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात अजित पवारांकडून संघटनात्मक जबाबदारीची मागणी करण्यात आली. पण बहुतांश काळ सत्तेच्या पदांवर असलेल्या अजित दादांच्या या मागणीमुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. अजितदादांनी संघटनात्मक पदाची मागणी करताच छगन भुजबळांनी ओबीसी प्रदेशाध्यक्ष करण्याची मागणी केली आहे.

अजितदादांनी थेट प्रदेशाध्यक्ष पदावर दावा केला नसला तरी त्यांचा रोख सर्वांच्या लक्षात आलेला आहे. पण राष्ट्रवादीत जातीय समतोल साधण्यासाठी अनेकदा पदांची फेरबदल झाल्याचं विसरून चालणार नाही.

---

# जादा भाडे अन् मीटरमध्ये छेडछाड करणारे टॅक्सी-रिक्षाचालक जाळ्यात!

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रवाशांकडून अधिक भाडे उकळणारे रिक्षा आणि टॅक्सीचालकांकडे पोलिसांनी लक्ष वळवले आहे. जवळचे भाडे नाकारणे, मुख्य रस्त्यावरच सोडणे, जवळचा रस्ता असतानाही जाणीवपूर्वक वळसा मारून नेणे असे प्रकार रिक्षा-टॅक्सीचालकांकडून घडतात.**

मुंबई : प्रवाशांकडून अधिक भाडे उकळणारे रिक्षा आणि टॅक्सीचालकांकडे पोलिसांनी लक्ष वळवले आहे. प्रवाशांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या चालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली असून, गुरुवारी पहिल्याच दिवशी ६९ टॅक्सी-रिक्षाचालकांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

जवळचे भाडे नाकारणे, मुख्य रस्त्यावरच सोडणे, जवळचा रस्ता असतानाही जाणीवपूर्वक वळसा मारून नेणे असे प्रकार रिक्षा-टॅक्सीचालकांकडून घडतात. त्याचबरोबर मीटरमध्ये छेडछाड करणे, मीटर न वापरता मनमानी भाडे आकारणे अशाही तक्रारी वाढल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत वाहतूक शाखेचे पोलीस सहआयुक्त प्रवीण पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी जास्त भाडे आकारणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. गुरुवारी पहिल्याच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी ६९ चालकांवर सुमारे ३४ हजार ५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे वाहतूक पोलिसांनी म्हटले आहे.



विमानतळ, रेल्वे स्थानके, शहराबाहेरून येणाऱ्या बसचे थांबे याकडे पोलिसांकडून विशेष लक्ष देण्यात येत आहे. या ठिकाणी उतरणारे अनेक प्रवासी हे पर्यटक असतात. मुंबईबद्दल त्यांना फार काही माहिती नसते. याच परिस्थितीचा गैरफायदा घेऊन कमी अंतरासाठी टॅक्सी, रिक्षाचालक जास्त भाडे उकळतात. अशा ठिकाणी वाहतूक पोलिसांकडून विशेष नजर ठेवली जाणार आहे.

जास्त भाडे आकारून प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायदा कलम २१ (१२) अंतर्गत कारवाई केली जात आहे. मोटार वाहन कायदा कलम १७७ अंतर्गत जास्त भाडे आकारणाऱ्या चालकांना दंडात्मक शिक्षेची तरतूद आहे. कुणी चालकाने भाडे अधिक

# ‘बांबू’ चित्रपटात तेजस्वी साकारणार अनोखी भूमिका



बहुगुणी अभिनेत्रीपासून सुरु झालेला तेजस्विनी पंडितचा प्रवास प्रस्तुतकर्तीपर्यंत पोहोचला आणि आता हा प्रवास आणखी पुढे गेला असून आता तिची ओळख एक यशस्वी निर्माती अशी झाली आहे. ‘अथांग’ सारख्या थरारक आणि सुपरहिट वेबसीरिजची निर्मिती केल्यानंतर आता तेजस्विनी नवीन वर्षात आपली पहिली फिचर फिल्म प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन आली आहे. काही दिवसांपूर्वीच ‘बांबू’चा ट्रेलर प्रदर्शित झाला आणि विशेष म्हणजे त्यात तेजस्विनीचीही झलक दिसली. त्यामुळे प्रेक्षकांना डबल धमाका अनुभवायला मिळणार आहे. विशाल सखाराम देवरुखकर दिग्दर्शित ‘बांबू’ चित्रपट येत्या २६ जानेवारी रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून या चित्रपटात अभिनय बेर्डे, वैष्णवी कल्याणकर, पार्थ भालेराव, शिवाजी साटम, अतुल काळे, समीर चौघुले, स्नेहल शिदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन निर्मित या चित्रपटाचे तेजस्विनी पंडित, संतोष खेर निर्माते आहेत. तर ‘बांबू’चे लेखन अंबर हडप यांनी केले आहे.

आपल्या पहिल्या चित्रपटाच्या निर्मितीबद्दल तेजस्विनी पंडित म्हणते, ”या टीमसोबत काम करण्याचा अनुभव खूप धमाल होता. त्यामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनाची मी आतुरतेने वाट पाहत आहे. अभिनेत्री म्हणून काम करताना आपली व्यक्तिरेखा कशी उत्कृष्टरित्या साकारली जाईल, यावर लक्ष केंद्रित केले जाते. मात्र निर्माती म्हणून काम करताना चहूबाजूकडे लक्ष द्यावे लागते. सतर्क राहावे लागते. चित्रपटाचा श्रीगणेशा झाल्यापासून ते चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत निर्मात्याची जबाबदारी असते. किंबहुना चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही अनेक गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. पहिल्या वेबसीरिजच्या निर्मितीचा अनुभव होताच.

# प्रियांका,कतरिना,आलियाचा जी ले जरा सिनेमा डबाबंद?

मुंबई : बॉलिवूडमधील आघाडीच्या अभिनेत्री असलेल्या प्रियांका चोप्रा जोनास, कतरिना कैफ आणि आलिया भट्ट यांचा बहुचर्चित अशा जी ले जरा सिनेमाबद्दल त्यांच्या चाहत्यांना खूपच उत्सुकता लागली आहे. या सिनेमाचं चित्रीकरण कधी सुरू होतं याकडे सर्वांच लक्ष लागलं होतं. परंतु आता या सिनेमासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. फरहान अख्तर दिग्दर्शित सिनेमाचं काम थांबवण्यात आलं आहे. या सिनेमाचं चित्रीकरण सुरू करण्यासाठी अनेक अडचणी येत असल्यानं हा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच या सिनेमात असलेल्या तिन्ही प्रमुख अभिनेत्रींच्या एकत्र तारखा मिळणं ही अवघड झालं होतं.

आलिया भट्ट हिचा रॉकी और रानी की प्रेम कहानी हा सिनेमा प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. तर दुसरीकडे आलिया हार्ट ऑफ स्टोन सिनेमातून हॉलिवूडमध्ये प्रवेश करण्यासाठी सज्ज झाली आहे. तर प्रियांक चोप्रा देखील तिच्या हेड ऑफ स्टेट या हॉलिवूडपटात व्यग्र आहे. तर कतरिनाकडे टायगर ३ आणि मैरी क्रिसमस हे दोन सिनेमे असून त्याच्या चित्रीकरणात ती व्यग्र आहे. त्यामुळे आता या तिन्ही अभिनेत्रींच्या तारखा मिळणं अवघड झाल्यानं फरहाननं सिनेमाचं काम सध्यातरी थांबवण्याचा निर्णय घेतला असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

पिंकविलानं दिलेल्या वृत्तानुसार, फरहान आणि आमिरची चर्चा झाली. खरं तर आमिरनं अभिनयातून काही काळ ब्रेक घेतला असून त्याच्या निर्मिती संस्थेच्या कामात तो लक्ष घालत आहे. आमिर खान प्रॉडक्शन्स 'चॅम्पियन्स' सिनेमाचा रिमेक बनवण्याच्या तयारीत आहे. हा सिनेमा जेवियर फेसरच्या २०१८ च्या स्पॅनिश स्पोर्ट्स ड्रामाचा रिमेक असणार आहे. याचं इंग्रजीत भाषांतर 'चॅम्पियन्स' असं झालं आहे..



# प्राजक्ताला सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार

मुंबईः सध्या महाराष्ट्राची क्रश कोण? असं विचारलं तर बिनदिक्तपणे एकच नाव समोर येतं. ते म्हणजे प्राजक्ता माळी. प्राजक्ता माळीची सध्या चलती आहे. आज तिने एका मानाच्या पुरस्कारावर नाव कोरलं.

प्राजक्ता माळीला पांडू या चित्रपटातील खलनायिकेच्या भूमिकेसाठी झी टॉकिजचा सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार मिळाल्यानंतर प्राजक्ताने सोशल मीडियावर फोटो पोस्ट केले आहेत. पोस्टमध्ये प्राजक्ता म्हणते, "कष्टाचं चीज व्हायला सुरूवात झाली असं म्हणायला हरकत नाही...

असचं अविरत प्रेम आणि अखंड पाठिंबा आणि आशिर्वाद असू देत, हीच विनंती.

मला खलनायिका म्हणून काम करायला मिळेल असं कधीही वाटलं नव्हतं, त्यात हा पुरस्कार मिळाला..

त्यामुळे विशेष आनंद...

प्राजक्ता माळीला आज झी टॉकिजच्या वतीने सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार मिळाला. तिने पांडू सिनेमामध्ये खलनायिकेची भूमिका निभावली होती.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या रानबाजार वेब सीरिजमध्ये प्राजक्ताने चक्क वेश्येची भूमिका केली होती. त्यामुळे तिने तिच्याच अभिनयाची रेषा मोडीत काढून एक वेगळा अंदाज दाखवून दिला होता. 'पांडू'मध्ये प्राजक्ताने पहिल्यांदाच खलनायिकेची भूमिका केली होती. नकारात्मक भूमिकेतूनही प्राजक्ताने अभिनयाची चुणूक दाखवून दिली होती. तिने साकारलेल्या या भूमिकेचं सर्वत्र कौतुक झालं. आज तिला त्याच भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट खलनायिकेचा पुरस्कार मिळाला.



# अमृता खानविलकर ठरली महाराष्ट्राची फेवरेट अभिनेत्री..

गेल्या वर्षभरात प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलेल्या मराठी सिनेमांची लोकप्रियता तर बॉक्स ऑफीससवरील कमाईत दिसलीच पण आता महाराष्ट्राला वेध लागले आहेत ते महाराष्ट्राची फेव्हरेट अभिनेत्री कोण हे जाणून घेण्याची. अखेर हे नाव समोर आलं आहे. झी टॉकीज वाहिनीतर्फे १५ डिसेंबरला महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण या पुरस्काराची नामांकने दणक्यात जाहीर झाली. यामध्ये महाराष्ट्राची फेव्हरेट अभिनेत्री कोण या विभागात अभिनेत्री अमृता खानविलकर, सोनाली कुलकर्णी, हृता दुर्गुळे, रितिका श्रोत्री आणि वैदेही परशुरामी यांच्यात चांगलीच चुरस रंगली. अखेर हा बहुमान अमृताला मिळाला आणि ती ठरली महाराष्ट्राची फेवरेट सर्वोत्कृष्ट अभिनेत्री..

अमृता खानविलकर हिची चंद्रमुखी या सिनेमातील चंद्रा ही भूमिका महाराष्ट्राची फेव्हरेट कोण या पुरस्कारासाठी नामांकन करण्यात आली होती. लेखक विश्वास पाटील लिखित चंद्रमुखी या कादंबरीवर बेतलेल्या या सिनेमातील अमृताची भूमिका तिच्या आयुष्यातील माइलस्टोन ठरली.

आजपर्यंत ग्लॅमरस अंदाजात दिसलेल्या अमृताने चंद्रमुखी ही व्यक्तीरेखा साकारत लावणी, तमासगीर कलावंतीणीचं आयुष्य, प्रेमासाठीची व्याकुळता दाखवण्यात सगळं कौशल्य पणाला लावलं. या सिनेमाने अमृताच्या अभिनय आणि नृत्यकलेचंही कौतुक झालं. त्यामुळे महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा किताब तिने पटकावला.

मराठी मनोरंजन विश्वात मानाचा समजला जाणारा महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण हा पुरस्कार सोहळा घेऊन यावर्षी पुन्हा एकदा झी टॉकीज ही वाहिनी रसिकांच्या भेटीला आली आहे. सिनेमा निर्मितीपासून सिनेमा प्रदर्शनापर्यंत आणि अनेक वैविध्यपूर्ण व प्रयोगशील कार्यक्रमाची नांदी सादर करणाऱ्या झी टॉकीज वाहिनीच्या पडदयावर काही दिवसांतच महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण पुरस्कार सोहळा प्रक्षेपित होणार आहे.



# भारताची मदार प्रणॉयवर!

## तैवान बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दिमाखात प्रवेश

। तैपई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारताचा अनुभवी बॅडमिंटनपटू परुपल्ली कश्यपचे आव्हान दुसऱ्या फेरीत संपुष्टात आले. माजी राष्ट्रकुलविजेत्या कश्यपला यजमान तैवानच्या सू लि यांग याच्याकडून १६-२१, १७-२१ असा पराभव पत्करावा लागला.**

शिस्त, संयम आणि नेटाने सराव अशा त्रिसूत्रीसह वाटचाल करणारा भारताचा बॅडमिंटनपटू एचएस प्रणॉयने गुरुवारी तैवान ओपन सुपर ३०० स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. या स्पर्धेत आता भारताची मदार फक्त प्रणॉयवर असेल; कारण पुरुष आणि महिला एकेरी, मिश्र दुहेरी अशा इतर विभागांतील भारताचे आव्हान संपुष्टात आले आहे.

जागतिक रँकिंगमध्ये नवव्या क्रमांकावर असलेल्या प्रणॉयने इंडोनेशियाच्या टॉमी सुगियार्तोवर २१-९, २१-१७ अशी सहज मात केली.



### अन्य खेळाडूंची हार

त्याआधी मिश्र दुहेरीत रोहन कपूर-सिक्की रेड्डी यांना तैवनाच्याच चियू सियांग चेह आणि लिन झियाओ मिन यांच्याविरुद्ध १३-२१, १८-२१ अशा पराभवाचा सामना करावा लागला. महिला एकेरीत तान्या हेमंतचा अव्वल सीडेड तैइ झ्यू यिंगविरुद्ध निभाव लागला नाही. ऑलिम्पिक आणि जागतिक स्पर्धेत उपविजेती ठरलेल्या तैइने तान्याला २-११, २१-६ असे हरवले.

पुढील फेरीत प्रणॉयचा सामना हाँगकाँगचा पाचवा सीडेड एनजी का लाँग अंगुस यांच्याविरुद्ध होईल.

सुगियार्तो हा पूर्वी जागतिक रँकिंगमध्ये तिसऱ्या क्रमांकावर होता, मात्र अलीकडे कामगिरीअभावी त्याची रँकिंगमध्ये ९५व्या क्रमांकावर घसरण झाली आहे. प्रतिस्पर्ध्याच्या खेळाचे लवकरात लवकर आकलन करायचे अन् डावपेचांनुसार आगेकूच करायची, हे सूत्र प्रणॉयने गुरुवारीही चोख वापरले. यामुळेच पहिल्या गेममध्ये १-१ अशा बरोबरीनंतर त्याने सुगियार्तोवर ८-१ अशी खणखणीत आघाडी घेतली होती. हाच झपाटा कायम राखत प्रणॉने पहिला गेम २१-९ असा खिशात टाकत प्रतिस्पर्धी सुगियार्तोवर दडपण आणण्यात यश मिळवले.

दुसऱ्या सेटच्या सुरुवातीला चित्र थोडे वेगळे दिसले. सुगियार्तोने प्रणॉयवर प्रतिहल्ला करत आघाडी घ्यायला सुरुवात केली. त्याला सूर गवसतो आहे की काय, असेही वाटत होते. या दुसऱ्या गेममध्ये एका क्षणी भारताचा शिलेदार प्रणॉय ३-१० असा पिछाडीवरही पडला होता.

प्रणॉयने मात्र सहजासहजी हार मानली नाही. त्याने सुगियार्तोच्या प्रतिहल्ल्यावर तोडगा शोधला. भारताच्या ३० वर्षीय बॅडमिंटनपटूने आपली पिछाडी कमी करत १५-१५ अशी बरोबरी साधली. ही बरोबरी अगदी १७-१७ पर्यंत कायम राहिली. अन् खेळाचा वेग वाढवत, अचूक चालींसह प्रणॉयने पुढील सलग चार गुण जिंकत दुसरा गेम आणि सामना खिशात टाकला.

## परुपल्ली कश्यप यांचे तैवान बॅडमिंटन स्पर्धेत दमदार विजय

। तैपई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



एचएस प्रणॉय, अनुभवी परुपल्ली कश्यप यांनी बुधवारी तैवान ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. यातही विशेष म्हणजे या दोघांनीही आपापल्या लढती सहज आणि कमी वेळात जिंकल्या. जागतिक रँकिंगमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रणॉयने अवघ्या २६ मिनिटांत यजमान तैवानच्या लिन यू सीन याला २१-११, २१-१० असे हरवून विजयी सलामी दिली. प्रणॉयने या सामन्यात आक्रमक खेळ केल्याचे पाहायला मिळाले. कारण प्रणॉयने पहिल्याच गेममध्ये दमदार आघाडी घेतली होती. त्यावेळी तो हा गेम सहज जिंकेल, असे वाटले होते. पहिला गेम जिंकल्यावर त्याचे मनोबल चांगलेच उंचावलेले पाहायला मिळाले. या गोष्टीचा फायदा त्याला दुसऱ्या गेममध्ये झाला. दुसऱ्या गेममध्ये त्याने अधिक आक्रमक खेळ केला आणि सुरुवातीला चांगली आघाडी घेतली होती. ही आघाडी त्याने शेवटपर्यंत कायम ठेवली आणि दुसऱ्या गेमसह सामनाही जिंकला. या सुपर ३००च्या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत प्रणॉयचा सामना होईल तो इंडोनेशियाच्या टॉमी सुगीयार्तो याच्याशी. माजी राष्ट्रकुलविजेत्या परुपल्ली कश्यपने जर्मनीच्या सॅम्युएल सियाओचा २१-१५, २१-१६ असा फडशा पाडला. कश्यपला दुसऱ्या फेरीत इंडोनेशियाच्या सू लि यांगशी दोन हात करावे लागतील.

### मिथुनचा कडवा प्रतिकार

भारताचा राष्ट्रीय विजेता मिथुन मंजूनाथचा पराभव झाला; पण त्याने आपल्या खेळाने मने जिंकली. मिथुनला दुसऱ्या सीडेड चो तिएन चेन (तैवान) याचे आव्हान १८-२१, २१-१४, १६-२१ असे मोडून काढले. मिथुनने चेनला एक तास, ११ मिनिटे झुंजविले. महिला एकेरीत तान्या हेमंतने विजयी सलामी दिली.

# पाकिस्तानने रंग दाखवलाच!

## आशिया कपच्या आयोजनाबाबत घेतला यू-टर्न

। इस्लामाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशियाई क्रिकेट परिषदेकडून आशिया कप २०२३ साठी पाकिस्तानने हायब्रिड मॉडेलचा प्रस्ताव स्विकारल्यानंतर या स्पर्धेच्या तारखा जाहीर झाल्या होत्या. आशिया कपच्या तारखांची घोषणा झाल्यानंतर आता काही दिवसांनी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने यू-टर्न घेतला आहे.**

पाकिस्तान क्रिकेट बोर्ड अर्थात पीसीबीचे नवे अध्यक्ष जका अशरफ यांनी एसीसीच्या हायब्रिड मॉडेलला फेटाळून लावले आहे. यामुळे आशिया कपच्या आयोजनावर मोठा प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.




गेल्या आठवड्यात जाहीर झालेल्या कार्यक्रमानुसार आशिया कपची सुरुवात ३१ ऑगस्ट रोजी पाकिस्तानमध्ये होईल आणि त्याची फायनल मॅच श्रीलंकेत १७ सप्टेंबर रोजी नियोजित आहे. भारताने पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्याने त्यांच्या लढती श्रीलंकेत होणार आहेत. आता मात्र अशरफ यांनी इस्लामाबाद येथे पत्रकार परिषदेत या गोष्टीला विरोध केला. मी हायब्रिड मॉडेल या आधीच फेटाळून लावले आहे. या गोष्टीला माझी मान्यता नाही. एसीसीने आशिया कपचे यजमानपद पाकिस्तानला दिले होते आणि आम्हीच ही स्पर्धा आयोजित करू.

पाकिस्तान बोर्डाच्या चेअरमननी बदललेल्या या भूमिकेमुळे जागतिक क्रिकेटला कोणताही फरक पडणार नाही. यामुळेच पाकिस्तानच्या अडचणी वाढू शकतील. जर अशरफ या गोष्टीवर अडून बसले तर बीसीसीआय संपूर्ण स्पर्धा पाकिस्तान बाहेर घेण्याचा आग्रह करेल. पाकिस्तानकडे एक तर श्रीलंकेत खेळण्याचा किंवा स्पर्धेतून बाहेर पडण्याचा असे दोन पर्याय असतील.


अशरफ यांच्या भूमिकेमुळे पाकिस्तानचा वर्ल्डकपमधील सहभाग अडचणीत येऊ शकतो. जर अशरफ यांनी त्यांचा हट्ट सोडला नाही तर आशिया कप स्पर्धा पाकिस्तान शिवाय पाच देशांमध्ये खेळावी लागले.

# एका सामन्याच्या आधारे निवड!

## 6 आंदोलक कुस्तीगिरांना विशेष सवलत

। इस्लामाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कुस्ती महासंघाचे कामकाज पाहण्यासाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) नियुक्त केलेल्या हंगामी समितीने सहा आंदोलक कुस्तीगिरांना आशियाई क्रीडा स्पर्धा आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवडीसाठी विशेष सवलत दिली आहे. त्यांची केवळ एका सामन्याच्या आधारे या स्पर्धासाठी भारतीय संघात निवड केली जाणार आहे.**



भारतीय कुस्ती महासंघाचे मावळते अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर महिला कुस्तीगिरांच्या लैंगिक शोषणाचे आरोप करताना देशातील आघाडीच्या कुस्तीगिरांनी आंदोलन पुकारले होते. या आंदोलक कुस्तीगिरांपैकी विनेश फोगट, बजरंग पुनिया, साक्षी मलिक, संगीता फोगट, सत्यवर्त कडियन आणि जितेंदर किन्हा यांना आशियाई क्रीडा स्पर्धा व जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठीच्या निवड चाचण्यांना मुकण्याची मुभा देण्यात आली आहे.

आंदोलक कुस्तीगिरांना या निवड चाचण्यांमधील विजेत्यांविरुद्ध खेळण्याची ५ ते १५ ऑगस्ट या कालावधीत संधी मिळेल. या एका लढतीत विजय मिळवल्यास त्यांचे भारतीय संघातील स्थान निश्चित होईल. ब्रिजभूषण यांच्याविरोधातील दीर्घकाळ चाललेल्या आंदोलनामुळे आपल्याला सरावासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही. त्यामुळे आपल्यासाठी ऑगस्टमध्ये निवड चाचणीचे आयोजन केले जावे अशी विनंती आंदोलक कुस्तीगिरांनी क्रीडा मंत्रालयाकडे केली होती.